International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar -Apr 2022

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पचे योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास

**जांबुतकर बालाजी रामचंद्र**
कै.डॉ.शंकरराव सातव कनिष्ठ महाविद्यालय, जवळा पांचाळ ता.कळमनुरी जि. हिंगोली

**प्रस्तावना**

हैद्राबाद संस्थानामध्ये मराठवाडा हा एक सुभा होता. हैद्राबाद संस्थानामधिल निजामाच्या अन्यायी राजवटीला जनता त्रासली होती. याविरोधात मराठवाड्यातील जनतेने अनेक ठिकाणी सत्याग्रह, आंदोलने उभी केली. वंदे मातरम चळवळीमार्फत खेडोपाडी जागृती करण्याचे कार्य झाले. हिंगोली जिल्ह्यामध्ये जंगल सत्याग्रह, करोडगिरी नाके, पोलीस ठाणे उध्वस्त करण्याचे कार्य झाले. रझाकारांच्या केंद्रावर सरहद्दीवरील कॅम्पसने हल्ले चढविणे, जाळपोळ, मोडतोड व वाहतुकीत अडथळे निर्माण करणे, धान्याची गोदामे लुटणे, वकिलांचे राजीनामे, विद्यार्थ्यांचा बहिष्कार व व्यापारी वर्गाचा हरताळ इ. मार्गाचा अवलंब करुन निजामास प्रतिकार केला. त्याचबरोबर हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, स्त्रिया अशा सर्व स्तरावरुन हजारो लोकांनी आपल्या प्राणांची बाजी लावून या लढ्यात उडी घेतली. हिंगोली जिल्ह्यांच्या शेजारी शेंबाळपिंप्री, लोणी, व्याड व वाशिम येथे सशस्त्र कॅम्पची स्थापना करुन हिंगोली जिल्ह्यातील जनतेने निजामाच्या विरोधात लढा दिला. या लढयामधील शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पचे योगदान जाणून घेण्यासाठी प्रस्तुत विषय निश्चित करुन शोधनिबंधाचे लेखन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत अध्ययनासाठी खालील उद्देश निश्चित केले होते.

१. शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पने हैद्राबाद संस्थानाविरोधात केलेल्या प्रतिकाराचा अभ्यास करणे.

२. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पच्या सेनानीच्या योगदानाचा अभ्यास करणे

**गृहितके :**

प्रस्तुत संशोधन समस्येविषयी संशोधकाने पुर्वानुमानाच्या आधारे काही गृहितके निश्चित केली होती. ती पुढील प्रमाणे आहेत.

१. शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पने हैद्राबाद संस्थानाविरोधात सशस्त्र प्रतिकार केला आहे.

२. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात शेंबाळपिंप्री सशस्त्र कॅम्पच्या सेनानीचे महत्वपुर्ण योगदान आहे.

**सशस्त्र कॅम्पची स्थापना :**

स्टेट काँग्रेसचा लढा अहिंसक मार्गाने चालवणे शक्य नाही जाणीव भुमिगत कार्यकर्त्यांना झाली. त्यांनी आपआपसात विचारविनिमय करुन हि वस्तुस्थिती स्टेट काँग्रेसच्या कृती समितीसमोर एका निवेदनाद्वारे कळविली. निजामाच्या एकतंत्री फॅसिस्ट व जुलमी सरकारविरुध्द आणि शस्त्रसज्ज रझाकाराविरुध्द लढण्यासाठी शस्त्रांची

नितांत गजर असल्याचे कृती समितीलाही वाटू लागले होते. कृती समितीने निजामाच्या दडपशाहीविरुध्द शस्त्रागारानिशी प्रतिकार करण्याचा निर्णय घेतला व त्याचप्रमाणे हैद्राबाद संस्थानाबाहेर सरहदीलगत सशस्त्र लढ्याची केंद्रे उघडून निजाम सरकारविरुध्द लढा चालू ठेवण्याचा आदेश कार्यकर्त्यांना दिला. कृति समितीच्या आदेशाप्रमाणे सशस्त्र लढा चालविण्यासाठी विनायकराव चारठाणकर यांची परभणी जिल्हाप्रमुख नेमणूक केल्यानंतर वाशिम येथे परभणी जिल्ह्याचा सशस्त्र कॅम्प उघडण्यात आला. ऑक्टोंबर १९४७ मध्ये परभणी जिल्ह्याचे सशस्त्र जिल्हा कार्यालय वाशिम येथे उघडण्यात आले. याशिवाय जिंतूर तालूक्यासाठी लोणी, हिंगोली तालूक्यासाठी व्याड (ता. वाशिम) वसमत तालूक्यासाठी दगडधानोरा (ता.पुसद) कळमनुरी तालूक्यासाठी शेबाळपिंपरी (ता.पुसद) परतूर तालूक्यासाठी सोनीसी ता.मेहकर [१] असे अन्य पाच सशस्त्र कॅम्प स्थापन करण्यात आले.

**शेंबाळपिंप्री कॅम्प**

हिंगोली जिल्ह्याच्या कळमनूरी तालूक्यासाठी शेंबाळपिंप्री ता. पूसद जि. यवतमाळ येथे १० नोव्हेंबर १९४७ रोजी कॅम्प स्थापन करण्यात आला. स्टेट कॉंग्रेसचे कळमनूरी तालूका संघटक दिपाजी पाटील यांची शेंबाळपिंप्री कॅम्प प्रमुख व पुरभाजी पाटील यांची कॅम्प उपप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. या कॅम्पवरील काही सैनिकांना गनिमी पध्दतीने हल्ले करणे, रायफल व स्वयंचलित शस्त्रे चालवणे, बॉम्ब तयारकरणे व त्यांचा वापर करणे, जिलेटीन लावणे, सॅनटेज करणे इत्यादी विशेष प्रशिक्षण घेण्यात भाग या कॅम्पवरील सैनिक रावसाहेब वडगांवकर, डिंगाजी, माणिकराव टाकळगव्हाणकर, नारायणराव खडेगाव सुर्यवंशी व गोविंदराव चन्नेवार यांना विशेष प्रशिक्षण घेण्यासाठी नागपूरला पाठविण्यात आले होते. विशेष प्रशिक्षण घेतलेल्या सैनिकांनी कळमनुरी तालूक्यातील करोडगिरी नाके व रझाकार केंद्रे यांच्यावर हल्ले करुन ती उद्ध्वस्त केली. तसेच या कॅम्पच्या निवडक सैनिकांनी परभणी जिल्ह्यातील लोणी, व्याड व धानोरा कॅम्पच्या सैनिकांबरोबर संयूक्तपणे बामणी पोलीस स्टेशन, वलाना, आजेगांव व जयपूर रझाकार केंद्रावर[२] केलेल्या हल्ल्यात भाग घेऊन महत्वाची कामगिरी बजावली.

**शेंबाळपिंप्री कॅम्पचे योगदान :**

शेंबाळपिंप्री कॅम्पच्या सैनिकांनी हैद्राबाद संस्थानाविरोधात सशस्त्र लढयात महत्वाचे योगदान दिले आहे . ते पुढीलप्रमाणे.

**गाडीबोरी करोडगिरी नाक्यावर हल्ला**

कळमनुरी तालूक्यातील पैनगंगा नदीच्या काठावर गाडीबोरी हा करोडगिरी नाका होता. गाडीबारी ही चौकी मजबूत होती. या नाक्याचा प्रमुख अत्यंत मगरुर व व्यसनी होता. त्यांच्या मदतीसाठी इतर चार जण होते. शेंबाळपिंप्री कॅम्पने गाडीबोरी करोडगिरी नाक्यावरील हल्ल्याचे नेतृत्व करण्यासाठी विठ्ठलराव नाईक याची नेमणूक करण्यात आली होती. विठ्ठलराव नाईक कामठ्यांच्या वेशात नाक्यावर गेले. नाकेदार व त्यांचे साथीदार दारु पिऊन

बेहोश झाले होते. दिपाजी पाटील यांच्या आदेशाप्रमाणे २६ नोव्हेंबर १९४७ रोजी विठ्ठलराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली ३० सशस्त्र सैनिकांनी पैनगंगा ओलांडली व आकस्मात नाक्यावर हल्ला केला. सैनिकांनी नाक्याला वेढा दिला. नाका पुर्णपणे जाळून टाकण्यात आला.या हल्ल्यात नाकेदार व त्याचे साथीदार मारले गेले. या हल्ल्यात भरदार बंदुका तलवारी व भाले यांचा वापर करण्यात आला होता. दिपाजी पाटील, विठ्ठलराव नाईक, राजाभाऊ वाकडे, मार्तंडराव नाईक, बाबुराव आडेकर, गुणाजीराव, रामभाऊ वाणी, गोविंदराव, दत्तोपंत्त सोडेगांवकर, लिंबाजी गौळमांजरीकर, आंबादास पांडे, शंकरराव कुलकर्णी, शामराव पानबुडे, रामचंद्र आनंदराव वाघमारे, गणपतराव जामगव्हाणकर इत्यादी सैनिकांनी भाग घेतला होता. निजामी पोलीसांनी दिपाजी पाटील व विठ्ठलराव नाईक यांच्यावर खुनाच्या आरोपाखाली पकड वॉरंट काढले पण त्यांना पकडणे शक्य झाले. नाही.[३]

**गौळमांजरीची लढाई**

गौळमांजरी हे गांव शेंबाळपिंप्री कॅम्पपासून ३-४ मैलावर पैनगंगेच्या काठावर आहे. शेंबाळपिंप्री कॅम्पचे पमुख दिपाजी पाटील, नागोराव धावंडेकर, रावसाहेब वडगांवकर, मार्तंडराव नाईक, यांच्यावर निजामी पोलीसांनी वॉरंट काढले होते. दिपाजी पाटील व रावसाहेब वडगांवकर यांना तर जिवंत अथवा ते पकडण्यासाठी दहा हजार रुपयाचे बक्षिस जाहीर केले होते. हे बक्षिस मिळविण्यासाठी रझाकारांनी एक डाव रचला. एक रझाकार वेषांतर करुन शेंबाळपिंप्री कॅम्पवर मुसलमानाने गौळ मांजरी येथे एका स्त्रीवर बलात्कार केला आहे. ही बातमी देण्यासाठी गेला. ही बातमी कळताच दिपाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली ५०-६० सैनिक पैनगंगा नदीच्या तीरावर गेले. दिपाजी पाटील यांनी नदीकाठच्या भागाची पाहणी केली. तेव्हा त्यांना नदीकाठावर दबा धरुन बसलेले रझाकार दिसले. त्यांनी वैषांतर करुन आलेल्या रझाकाराला बेदम मारहाण केल्यानंतर त्यांनी खरे काय ते सांगितले. नदीपलीकडे दरडीआड लपलेल्या रझाकाराच्या लक्षात येताच त्यांनी गोळीबार केला. त्यामध्ये दिपाजी पाटील थोडक्यात बचावले दोन्ही बाजुंनी गोळीबार सुरु झाला. यामध्ये तीन रझाकार ठार झाले आणि कित्येक जखमी झाले.[४]

**शिऊर करोडगिरी नाक्यावर हल्ला**

शेंबाळपिंप्री कॅम्पच्या सैनिकांनी २० एप्रिल १९४८ ला गनिमीहल्ला चढवून शिऊरकरोडगिरी नाका नष्टकेला व तेथील रेकॉर्ड जाळून टाकले.[५]

**गांजापूरची लढाई**

निजामी पोलीसांनी मिलीटरी सैनिकांच्या व रझाकाराच्या मदतीने २६ एप्रिल १९४८ ला गांजापूर या गावावर हल्ला केला. शेंबाळपिंपरी कॅम्पच्या गस्ती पथकाला कळताच गस्ती पथकांतील सैनिक लोकांच्या मदतीला गेले. कॅम्पच्या सैनिकांनी आणि शेतकऱ्यांनी पोलीस व रझाकारांचा प्रतिकार केला. या हल्ल्यात निजामाचा एक सैनिक ठार झाला आणि पाचजन जखमी झाले व इतर पळुन गेले.[६]

**मरडगा निवळी रस्त्यावरील रझाकाराचा बंदोबस्त**

मरडगाते निवळी रस्त्यावर वाटमारी करुन लोकांना व संस्थानाबाहेर जाणाऱ्या निर्वासितांना लुटत असत. पुरभाजी पाटील यांच्या पथकाने लुटमार करण्याचा रझाकारावर हल्ला केला. त्यामध्ये दोन रझाकार ठार झाले.[७]

**भाटेगाव येथील रोहिल्याचा बंदोबस्त**

भाटेगाव येथील रोहिला त्यांच्या साथीदाराच्या मदतीने खेड्यापाड्यातील लोकांना फार त्रास देत होता. स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या हालचालीची माहिती पोलीसांना कळवित होता. या रोहिल्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शेंबाळपिंपरी कॅम्पचे विठ्ठलराव नाईक, माणिकराव टाकळगव्हाणकर, पुरभाजी पाटील, रावसाहेब पेडगांवकर, मार्तंडराव नाईक, बापुजी मास्तर इत्यादी सैनिक १५ जानेवारी १९४८ ला भाटेगाव ला गेले. रोहिला येथे साथीदारासह शेतात झोपला होता. सैनिकांची चाहूल लागताच त्याने गोळीबार सुरु केला. त्याला कॅम्पच्या सैनिकांनी गोळीबारानेच प्रत्युत्तर दिले. या गोळीबार भाटेगावचा हा रोहिला ठार झाला.[८]

**वाकोडी येथे निजामी पोलीसांशी चकमक**

२६ मे १९४८ रोजी कळमनुरी तालूक्यातील वाकोडी या गावावर हल्ला करण्याकरिता निजामी पोलीस येत असल्याची बातमी शेंबाळपिंपरी कॅम्पला मिळाली. बातमी मिळताच कॅम्पचे सैनिक निजामी पोलीसांचा हल्ला होण्यापुर्वीच त्यांच्यावर चालून गेले. उन्हाळ्याचे दिवस होते भर उन्हात चकमक चालू होती. शेवटी निजामी पोलीसांना माघार घ्यावी लागली. शस्त्रे व दारुगोळा टाकुनते पळाले या हल्ल्यात सहा पोलीस ठार झाले. शेंबाळपिंपरी कॅम्पमधील गणपती राघोजी रा.खापरखेडा व गोविंद विठोबा रा.वाकोडी यांना विरमरण प्राप्त झाले.[९]

**निष्कर्ष:**

१. शेंबाळपिंपरी कॅम्पने निजामविरोधी लढयात जनतेने शिंदीची झाडे तोडणे, पोलीस ठाण्यात बॉम्ब टाकणे, रेल्वे पाडणे इत्यादी हिंसक मार्गाचा अवलंब केला.
२. शेंबाळपिंपरी कॅम्पच्या निवडक सैनिकांनी परभणी जिल्ह्यातील लोणी, व्याड व धानोरा कॅम्पच्या सैनिकांबरोबर संयूक्तपणे बामणी पोलीस स्टेशन, वलाना, आजेगांव व जयपूर रझाकार केंद्रावर केलेल्या हल्ल्यात भाग घेऊन महत्वाची कामगिरी बजावली.
३. शेंबाळपिंपरी कॅम्प हा हैद्राबाद संस्थानाच्या सीमावर्ती भागात म्हणजे विदर्भ प्रातांमध्ये होता.
४. हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनामध्ये शेंबाळपिंपरी कॅम्पचे योगदान मोठे आहे.

**सारांश**

हिंगोली जिल्हा हा नवनिर्मित जिल्हा आहे. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात हिंगोली हा जिल्हा परभणी जिल्ह्याचा भाग होता. हिंगोली जिल्हा हा हैद्राबाद संस्थानाच्या सीमावर्ती भागात म्हणजे विदर्भ प्रातांच्या लगत आहे. यामुळे इतर जिल्ह्याच्या तुलनेत हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनामध्ये हिंगोली जिल्ह्याचे योगदान मोठे आहे. हिंगोली

जिल्ह्यातील सामान्य जनतेनी निजामाविरोधात दिलेला लढा हा अतुलनीय आहे. त्याचबरोबर सीमावर्ती भागात असलेल्या शेंबाळपिंपरी सशस्त्र कॅम्पचे योगदान खुप मोठे आहे.

**संदर्भ सूची**


१. पगडी,सेतू माधवराव, (१०५६),म.सा.प. हैद्राबाद, हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, २६

२. कुरुंदकर, नरहर., (१९३८), हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन, औरंगाबाद, रजत प्रकाशन, ५१.

३. चपळगावकर,नरेंद्र.,(१९९९),कहाणी हैद्राबाद लढ्याची, पुणे, देशमुख आणि कंपनी पब्लिकेशन, ९-१०

४. भालेराव अनंत (२००१), हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, (दु.आ)मुंबई, मौज प्रकाशन गृह,४८६-४८८

५. देव, प्रभाकर., (संपा), (१९९९), हैद्राबाद मुक्तीसंग्राम, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोदी, कुलसचिव, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,१८

६. देऊळगावकर, वि.पा. (अनु),(१९९८), हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या आठवणी(दुसरी आवृत्ती) हैद्राबाद, स्वामी रामानंद तीर्थस्मारक समिती, ८३

७. कुंटे, भ.ग. (संपा), (१९७६), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, दार्शनिका विभाग, मुबई, २३-२४

८. चारठाणकर, विनायकराव.(संपा.)(१९९६) स्वातंत्र्य संग्राम परभणी जिल्हयाचे योगदान (प्र.आ.) परभणी जिल्हा स्वा.सै.स.परभणी,४२

९. चारठाणकर, विनायकराव.(संपा.)(१९९६) स्वातंत्र्य संग्राम परभणी जिल्हयाचे योगदान (प्र.आ.) परभणी जिल्हा स्वा.सै.स.परभणी,४३